## —: प्रेस नोट :—

**दादर पोलीस ठाणे, मुंबई     दिनांक — ०१/०८/२०२२**

**'' भारतीय चलनाच्या १००/— रू व २००/— रू दराच्या बनावट चलनी नोटा छापुन त्या चलनात आणणारी कर्नाटक येथील टोळी दादर पोलीस ठाण्याकडून अटक.''**

..................................................................................................................

दिनांक १४/०७/२०२२ रोजी ११.०० वाजता पोलीस ठाणे दादर येथील गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. रामकृष्ण सागडे सोबत पोहवा १५३९७/रावराणे, पो.ना. ०४०२६८/पाटणे, पो.ना. ०४११३६/महाडिक, पो.शि. क्र. ०८०५६९/आंधळे, पो.शि. ०९१६९४/ कोलते व पो.शि.१३०३३३/माने पोलीस ठाणे हद्दीमध्ये शासकिय वाहनाने गस्त करीत असताना गोपनिय बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, एक इसम सयानी रोड परेल एसटी डेपो समोरील भागात भारतीय चलनाच्या बनावट नोटा सोबत बाळगून मार्केटमध्ये त्या बनावट नोटा खऱ्या आहेत असे भासवुन वापरात आणत आहे अशी माहिती मिळाल्याने सदरची माहिती मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा. पोलीस निरीक्षक ( गुन्हे) यांना सांगून त्यांच्या मार्गदर्शनाखाली सदर इसमास ताब्यात घेणेकामी सापळा लावण्यात आला व परेल एस.टी. डेपो समोरुन बनावट नोटा जवळ बाळगणारा इसम नामे आनंदकुमार रचना ममदापूर, वय २९ वर्षे, राहणार जि. गुलबर्गा, राज्य कर्नाटक ह.मु. दादर (प.), मुंबई — २८ यास ताब्यात घेण्यात आले. त्याच्या अंगझडतीमध्ये १०० रुपये दराच्या १२ बनावट नोटा मिळून आल्याने पोलीस नाईक अजित महाडिक यांनी सरकारतर्फे फिर्याद देवून नमूद इसमाविरुध्द पोलीस ठाणे दादर येथे गु.र.क्र. ५९७/२०२२, कलम ४८९(ब), ४८९ (क), ३४ भा.द.वि. अन्वये गुन्हा नोंद केला.

सदर गुन्हयाचा तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक ( गुन्हे ) यांच्या आदेशाने स.पो.नि. सागडे व गुन्हे प्रकटिकरण पथक करत असताना अटक अरोपी आनंदकुमार ममदापूर याच्या ताब्यातून तो राहत असलेल्या ठिकाणाहून आणखी १०० व २०० रुपये दराच्या नकली बनावट नोटा एकूण रुपये ४३,८०० मिळून आले. त्यानंतर अटक आरोपीने सदरच्या नोटा या हुमनाबाद, कर्नाटक येथील शिवकुमार शंकर याने दिल्याचे सांगितल्याने तपास पथक हुमनाबाद, कर्नाटक येथे जावून पाहिजे आरोपी शिवकुमार शंकर उर्फ शिवु, वय ३८ वर्षे, रा.ठी. जि. बिदर, राज्य कर्नाटक. यास व त्याचे सोबत आलेला त्याचा साथीदार किरण अरुण कांबळे, वय २८ वर्षे, रा.ठी. जि. बिदर, राज्य कर्नाटक यांना ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यात २०० रुपये दराच्या १०३ नकली बनावट नोटा एकूण रुपये २०,६०० मिळून आले. त्यामुळे शिवकुमार शंकर व किरण अरुण कांबळे यांना नमुद गुन्हयात अटक करण्यात आली. त्यानंतर आरोपी शिवकुमार शंकर याच्याकडे सविस्तर चौकशी केली असता त्याने सांगितले की, मी मुंबईमधील आकाश तडोलगी यालादेखील १०० व २०० रुपये दराच्या नकली बनावट नोटा दिलेल्या आहेत त्यावरुन पाहिजे आरोपी आकाश शिवराज तडोलगी, वय २६ वर्षे, दहिसर प, मुंबई ६८ याचा शोध घेतला असता तो मिळून आल्याने व त्याच्या ताब्यात १०० व २०० रुपये दराच्या नकली बनावट नोटा एकूण रुपये ३०००/— मिळून आल्याने त्यास देखील दिनांक २६/०७/२०२२ रोजी सदर गुन्हयामध्ये अटक करण्यात आली.

एकंदर सर्व आरोपींकडे चौकशी केली असता असे निष्पन्न झाले की, आरोपी आनंदकुमार ममदापूर व आकाश तडोलगी यांना शिवकुमार शंकर याने १०० व २०० रुपये दराच्या नकली बनावट नोटा चलनात आणणेकामी दिल्या होत्या व शिवकुमार शंकर यास सदरच्या बनावट नोटा किरण कांबळे याने दिलेल्या आहेत. त्यावरुन किरण कांबळे याची कसून चौकशी केली असता त्याने सदर गुन्हयात मिळूण आलेल्या १०० व २०० रुपये दराच्या नकली बनावट नोटा स्वत: छापून त्या शिवकुमार शंकर याचे मार्फतीने इतरांना देवून भारतिय बाजारपेठेत चलनात आणल्या आहेत व त्याबदल्यात टक्केवारीच्या स्वरुपात खऱ्या चलनी नोटा घेतलेल्या आहेत. आरोपी किरण अरुण कांबळे याने गुन्हा कबुल करुन सदरच्या बनावट नोटा छपाईचे साहित्य ज्यामध्ये ( एक कलर प्रिंटर, पेपर कटर, साधे कटर, स्टीलची पट्टी, शाईच्या बाटल्या, नोट छपाईसाठी लागणारा कागद, हिरव्या रंगाचा टेप इ.) साहित्य हे आरोपीच्या हुमनाबाद, कर्नाटक येथे असलेल्या भाडयाच्या खोलीतून तसेच त्याच्या जि. बिदर, कर्नाटक येथील घरातून जप्त करण्यात आले आहे. **सदर गुन्हयामध्ये एकूण चार आरोपी अटक करण्यात आले असून चारही आरोपी हे मुळ कर्नाटक राज्यामधील असून त्यांच्या ताब्यातून भारतीय चलनाच्या १०० रु.दराच्या १५८ बनावट नोटा व २०० रु.दराच्या २६४ बनावट नोटा असे एकूण ६८,६०० रुपयाच्या नकली बनावट नोटा व सदर नोटा छपाईचे सर्व साहित्य देखील जप्त करण्यात आले आहे.** सध्या चारही आरोपी न्यायालयीन कोठडीत आहेत.

सदरची यशस्वी कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त श्री ज्ञानेश्वर चव्हाण, मा. पोलीस उप आयुक्त श्री. प्रणय आशोक, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. अविनाश कानडे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक दादर पोलीस ठाणे श्री. महेश मुगुटराव, पो.नि सागर शिवलकर यांच्या देखरेखी खाली सपोनि रामकृष्ण सागडे, पो.ह रावराणे, पो.ना संतोष पाटणे, पो.ना. सागर निकम, पो.ना अजित महाडीक, पो.ना. मनेश मोरे, पो.शि आंधळे, महेश कोलते, गणेश माने, ध्रुव कोलते यांनी यशस्वी पार पाडली आहे.